www.prepp.in

prepp Your Personal Exams Guide

Language Code : **11**

इस पुस्तिका में **20** मुद्रित पृष्ठ हैं।
This booklet contains **20** Printed pages.

# SAS-24-II

**प्रश्न-पत्र-II / PAPER-II**
**मराठी भाषा परिशिष्ट**
**Marathi Language Supplement**
**भाग-IV & V / PART-IV & V**

**मुख्य परीक्षा पुस्तिका संख्या / Main Test Booklet No.**

**इस परीक्षा पुस्तिका को तब तक न खोलें जब तक कहा न जाए।**
**Do not open this Test Booklet until you are asked to do so.**
**इस परीक्षा पुस्तिका के पिछले आवरण (पृष्ठ 19 व 20) पर दिए निर्देशों को ध्यान से पढ़ें।**
**Read carefully the Instructions on the Back Cover (Page 19 & 20) of this Test Booklet.**

**मुख्य परीक्षा पुस्तिका कोड / Main Test Booklet Code**
**O**

**मराठी में निर्देशों के लिए इस पुस्तिका का पृष्ठ 2 देखें। / FOR INSTRUCTIONS IN MARATHI SEE PAGE 2 OF THIS BOOKLET.**

## परीक्षार्थियों के लिए निर्देश

1. यह पुस्तिका मुख्य परीक्षा पुस्तिका की एक परिशिष्ट है, उन परीक्षार्थियों के लिए जो **या** तो भाग IV (भाषा I) **या** भाग V (भाषा II) **मराठी** भाषा में देना चाहते हैं, लेकिन **दोनों नहीं**।
2. परीक्षार्थी भाग I एवं भाग II **या** III के उत्तर मुख्य परीक्षा पुस्तिका से दें और भाग IV व V के उत्तर उनके द्वारा चुनी भाषाओं से।
3. अंग्रेज़ी व हिन्दी भाषा पर प्रश्न मुख्य परीक्षा पुस्तिका में भाग IV व भाग V के अन्तर्गत दिए गए हैं। भाषा परिशिष्टों को आप अलग से माँग सकते हैं।
4. इस पृष्ठ पर विवरण अंकित करने एवं उत्तर पत्र पर निशान लगाने के लिए **केवल काले/नीले बॉल पॉइंट पेन** का प्रयोग करें।
5. इस भाषा पुस्तिका का **संकेत** है **O**। यह सुनिश्चित कर लें कि इस भाषा परिशिष्ट पुस्तिका का संकेत, उत्तर पत्र के **पृष्ठ-2** एवं मुख्य परीक्षा पुस्तिका पर छपे संकेत से मिलता है। अगर यह भिन्न हो, तो परीक्षार्थी दूसरी भाषा परिशिष्ट परीक्षा पुस्तिका लेने के लिए निरीक्षक को तुरन्त अवगत कराएँ।
6. इस परीक्षा पुस्तिका में **दो** भाग IV और V हैं, जिनमें **60** वस्तुनिष्ठ प्रश्न हैं, जो प्रत्येक 1 अंक का है :
   भाग-IV : भाषा-I (मराठी) (प्र. 91 से प्र. 120)
   भाग-V : भाषा-II (मराठी) (प्र. 121 से प्र. 150)
7. भाग-IV में भाषा-I के लिए 30 प्रश्न और भाग-V में भाषा-II के लिए 30 प्रश्न दिए गए हैं। इस परीक्षा पुस्तिका में केवल मराठी भाषा से संबंधित प्रश्न दिए गए हैं। **यदि भाषा-I और/या भाषा-II में आपके द्वारा चुनी गई भाषा(एँ) मराठी के अलावा है तो कृपया उस भाषा वाली परीक्षा पुस्तिका माँग लीजिए। जिन भाषाओं के प्रश्नों के उत्तर आप दे रहे हैं वह आवेदन पत्र में चुनी गई भाषाओं से अवश्य मेल खानी चाहिए।**
8. **परीक्षार्थी भाग-V (भाषा-II) के लिए, भाषा सूची से ऐसी भाषा चुनें जो उनके द्वारा भाषा-I (भाग-IV) में चुनी गई भाषा से भिन्न हो।**
9. रफ कार्य परीक्षा पुस्तिका में इस प्रयोजन के लिए दी गई खाली जगह पर ही करें।
10. सभी उत्तर केवल OMR उत्तर पत्र पर ही अंकित करें। अपने उत्तर ध्यानपूर्वक अंकित करें। उत्तर बदलने हेतु श्वेत रंजक का प्रयोग निषिद्ध है।

## INSTRUCTIONS FOR CANDIDATES

1. This booklet is a supplement to the Main Test Booklet for those candidates who wish to answer **EITHER** Part IV (Language I) **OR** Part V (Language II) in **MARATHI** language, but **NOT BOTH**.
2. Candidates are required to answer Part I and Part II **OR** III from the Main Test Booklet and Parts IV and V from the languages chosen by them.
3. Questions on English and Hindi languages for Part IV and Part V have been given in the Main Test Booklet. Language Supplements can be asked for separately.
4. Use **Black/Blue Ball Point Pen only** for writing particulars on this page/ marking responses in the Answer Sheet.
5. The CODE for this Language Booklet is **O**. Make sure that the CODE printed on **Side-2** of the Answer Sheet and on your Main Test Booklet is the same as that on this Language Supplement Test Booklet. In case of discrepancy, the candidate should immediately report the matter to the Invigilator for replacement of the Language Supplement Test Booklet.
6. This Test Booklet has **two** Parts, IV and V, consisting of **60** Objective Type Questions, each carrying 1 mark :
   Part-IV : Language-I (Marathi) (Q. 91 to Q. 120)
   Part-V : Language-II (Marathi) (Q. 121 to Q. 150)
7. Part-IV contains 30 questions for Language-I and Part-V contains 30 questions for Language-II. In this Test Booklet, only questions pertaining to Marathi language have been given. **In case the language/s you have opted for as Language-I and/or Language-II is a Language other than Marathi, please ask for a Test Booklet that contains questions on that language. The language being answered must tally with the languages opted for in your Application Form.**
8. **Candidates are required to attempt questions in Part-V (Language-II) in a language other than the one chosen as Language-I (in Part-IV) from the list of languages.**
9. Rough work should be done only in the space provided in the Test Booklet for the same.
10. The answers are to be recorded on the OMR Answer Sheet only. Mark your responses carefully. No whitener is allowed for changing answers.

परीक्षार्थी का नाम (बड़े अक्षरों में) : ____________________
Name of the Candidate (in Capitals) :
अनुक्रमांक : (अंकों में) / Roll Number : in figures ____________________
: शब्दों में / in words ____________________
परीक्षा केन्द्र (बड़े अक्षरों में) : ____________________
Centre of Examination (in Capitals) :
परीक्षार्थी के हस्ताक्षर : ____________________
Candidate's Signature :
निरीक्षक के हस्ताक्षर : ____________________
Invigilator's Signature :
Facsimile Signature Stamp of Centre Superintendent : ____________________

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

Language Code : **11**

ही पुस्तिका **20** पृष्ठ आहे.

# SAS-24-II

**प्रश्नपत्रिका-II**

**मराठी भाषा पुरवणी**

**भाग IV आणि V**

**चाचणी पुस्तिका कोड**

**O**

**ही पुस्तिका उघडायला सांगेपर्यंत ती उघडू नका.**

**या पुस्तिकेच्या मलपृष्ठावरील ( 19 आणि 20 ) सूचना काळजीपूर्वक वाचा.**

**परीक्षार्थीसाठी सूचना :**

1. ही पुस्तिका मुख्य चाचणी पुस्तिकेची पुरवणी असून ती अशा परीक्षार्थींकरिता आहे, जे **मराठी** भाषेतील भाग IV (भाषा I) **किंवा** भाग V (भाषा II) **यांपैकी एकाची** उत्तरे लिहू इच्छितात, **दोन्हींची नव्हे.**
2. परीक्षार्थींनी मुख्य चाचणी पुस्तिकेतील भाग I आणि भाग II **किंवा** III सोडवायचा आहे आणि त्यांनी निवडलेल्या भाषेतील भाग IV आणि V सोडवायचा आहे.
3. भाग IV आणि V यांमधील इंग्लिश आणि हिन्दी भाषांवरील प्रश्न मुख्य चाचणी पुस्तिकेत दिलेले आहेत. पुरवण्या स्वतंत्रपणे मागून घेता येतील.
4. या पृष्ठावर माहिती लिहिण्यासाठी/प्रतिक्रिया नोंदवण्यासाठी **केवळ काळे / निळे बॉल पॉइंट पेनच** वापरा.
5. या भाषा पुस्तिकेचे **कोड O** आहे. उत्तर पत्रिकेच्या **बाजू- 2** वर छापलेले कोड आणि या भाषा पुरवणी पुस्तिकेवरील कोड एकच आहे, याची खात्री करून घ्या. जर काही विसंगती असेल तर परीक्षार्थीने ती ताबडतोब पर्यवेक्षकास दाखवावी आणि भाषा पुरवणी पुस्तिका बदलून मागावी.
6. या चाचणी पुस्तिकेत IV आणि V असे **दोन** भाग आहेत. त्यांमध्ये 60 वस्तुनिष्ठ पद्धतीचे प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास एक गुण आहे.

   **भाग-IV : भाषा-I ( मराठी )** *(प्र. 91 ते प्र. 120)*

   **भाग-V : भाषा-II ( मराठी )** *(प्र. 121 ते प्र. 150)*
7. **भाग-IV** मध्ये भाषा-I साठी 30 प्रश्न आहेत आणि भाग-V मध्ये भाषा-II साठी 30 प्रश्न आहेत. या चाचणी पुस्तिकेत केवळ मराठी भाषेशी संबंधित प्रश्न दिलेले आहेत. **जर तुम्ही भाषा-I व/वा भाषा-II साठी निवडलेली भाषा पेक्षा मराठी वेगळी असेल, तर कृपया त्या भाषेवरील प्रश्न असलेल्या चाचणी पुस्तिकेची मागणी करा. ज्या भाषेची उत्तरे तुम्ही लिहीत आहात ती भाषा आणि तुमच्या अर्जामध्ये निवडलेली भाषा या एकच असल्या पाहिजेत.**
8. **भाग-V ( भाषा-II ) याकरिता असलेली भाषा ही भाषांच्या यादीमधील निवडलेली भाषा-I (IV भागातील) पेक्षा निराळी असली पाहिजे.**
9. चाचणी पुस्तिकेमध्ये कच्चा आराखडा करण्यासाठी नेमून दिलेल्या जागेतच तो करावा.
10. OMR उत्तर पृष्ठावरच उत्तरे नोंदवायची आहेत. तुमच्या प्रतिक्रिया काळजीपूर्वक नोंदवा. उत्तरात बदल करण्यासाठी पांढरा रंग (whitener) वापरण्याची परवानगी नाही.

परीक्षार्थीचे नाव : ____________________

अनुक्रमांक : अंकांमध्ये : ____________________

: शब्दांमध्ये : ____________________

परीक्षाकेंद्र : ____________________

परीक्षार्थीची सही : ____________________ पर्यवेक्षकाची सही : ____________________

Facsimile signature stamp of
Centre Superintendent ____________________

prepp
Your Personal Exams Guide

परीक्षार्थींनी **भाषा–I** चा पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी **भाग–IV** मधील ( **प्रश्न क्र.** 91 ते 120 ) यांची उत्तरे द्यावीत.

Candidates should attempt the questions from **Part-IV (Q.No. 91-120)**, if they have opted **MARATHI** as **Language-I** only.

→

Prepp Your Personal Exams Guide

## भाग–IV

## भाषा–I

## मराठी

| |
|---|
| **महत्त्वपूर्ण :** परीक्षार्थींनी भाषा – **I** चा पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी **भाग – IV** मधील **( प्रश्न क्र. 91 ते 120 )** यांची उत्तरे द्यावीत. |

**सूचना : पुढील उतारा वाचा आणि प्रश्न क्रमांक 91 ते 99 यासाठी योग्य पर्यायाची निवड करा.**

पालकत्व ही आपण आपल्या मुलांच्या सोबतीने सुरू केलेली एक आनंदयात्रा आहे. पालकत्व हे स्वत:साठी की आपल्या मुलांसाठी, या प्रश्नाचं उत्तर आपल्याला मिळालं की पालकत्वाचा प्रवास हा सरळ, सुंदर आणि सोपा होऊन जातो. पालकत्व ही एक जबाबदारी आहे, पालकत्व ही एक जोखीम आहे, पालकत्व म्हणजे शिस्तशीर आयुष्याचा आदर्श नमुना आहे, पालकत्व म्हणजे संस्कार आहेत, पालकत्व म्हणजे त्याग आहे, पालकत्व हे एक ओझं आहे... असे पालकत्वाचे अनेक विभिन्न दृष्टिकोन घेऊन पालक मुलांसोबत राहत असतात.

पालकागणिक पालकत्वाबद्दलचा दृष्टिकोन बदलत असतो. पालकांचं लहानपण कसं गेलं, पालकांच्या पालकांनी त्यांचं संगोपन कसं केलं, यावरही अनेकदा पालकत्व निश्चित होत असतं. तुमच्या पालकांनी केलेले संस्कार, तुमचं वाचन, तुमचं शिक्षण, तुमची पूर्ण झालेली आणि अपूर्ण राहिलेली स्वप्नं, तुमची कौटुंबिक पार्श्वभूमी, तुमची संगत, तुमच्या महत्त्वाकांक्षा, तुमच्यावरचे संस्कार, तुमची बालपणीच्या सर्व घटकांकडून झालेली जडणघडण, तुमचा मूळचा पिंड, तुमच्यातल्या जाणिवा, तुमच्यातली संवेदनशीलता, तुमचे विचार, तुमच्या भावना, तुमचं व्यक्त होणं, तुमच्यातली समज, तुमचा स्वत:चा व्यक्तिमत्त्व विकास, तुमचा जगाकडे बघण्याचा दृष्टिकोन, तुमची आदर्शाची कल्पना... यावर तुमचं पालकत्व कमी अधिक प्रमाणात ठरत असतं. खूपदा आपल्या बालपणी घडलेले दु:खद आणि यातनादायी प्रसंग पालक विसरू शकत नाहीत. त्या प्रसंगाचं लोढणं ते आयुष्यभर वाहतात आणि त्याचा परिणाम मग साहजिकच त्यांच्या स्वत:च्या पालकत्वावरती होतो आणि फटका मात्र मुलांना बसतो!

म्हणून पालकत्वामध्ये आपण दु:खद आणि अप्रिय गोष्टी किती लवकर विसरतो, इतरांना आणि स्वत:ला माफ करण्याचं औदार्य आपल्यात आहे का, यावरही पालकत्व अवलंबून असतं. आयुष्य म्हणजे सुखदु:खाची, प्रेम आणि द्वेष याची, चांगल्या आणि वाईट याची नेहमीच सरमिसळ असते; परंतु यात कशाची निवड करायची, हे ठरवण्यासाठी प्रत्येकाकडे नीरक्षीर विवेक हा लागतोच. पालकांना तर तो विशेष करून बाळगावा लागतो. कारण ही सरमिसळ तुम्ही तुमच्या आयुष्याच्या मूल्यांमध्ये, विचारांमध्ये आणि भावनांमध्ये जशीच्या तशी आणली, तर त्याचे दुष्परिणाम हे पालकत्वावरती होतातच होतात! पालकत्व हा सर्वात महत्त्वाचा विषय आहे. त्यावर आपलं स्वत:चं आणि आपल्या कुटुंबाचं जीवनमान ठरत असतं. जीवनमूल्य आकार घेत असतात; परंतु अशा महत्त्वाच्या विषयाचा अभ्यास करण्यासाठी कोणतेही व्यासपीठ उपलब्ध नाही, ही खेदाची गोष्ट आहे. पालकत्वाचा अभ्यासक्रम नाही. पालकत्वाचा कुठलाही कोर्स नाही. शाळा नाही, कॉलेज नाही. एखादी व्यक्ती आई किंवा वडील झाली की ती नैसर्गिकरीत्या पालकही झाली असं आपण समजतो... पालकत्वाला सर्टिफिकेटही नाही. त्यामुळे खुपदा ज्याला जसं पाहिजे तसं त्याचं पालकत्व हे आकार घेत राहतं. म्हणूनच पालकत्व हे घरागणिक बदलतं. खूपशा गोष्टी या घरागणिक बदलत राहिल्या, तरी पालकत्वाचा मूलभूत गाभा आणि पाया हा बदलू शकत नाही. या दोन्ही गोष्टी बदलता कामा नयेत, याची खबरदारी पालकांनी घ्यायला हवी...

**91.** लेखकाच्या मते कोणत्या गोष्टीचा उलगडा झाला की पालकत्त्वाचा प्रवास सुगम, सुंदर होतो?

(1) महत्त्वाकांक्षा की संस्कार

(2) मूळचा पिंड की जाणिवा

(3) पालकत्त्व स्वत:साठी की मुलांसाठी

(4) मूलभूत गाभा की पाया

**92.** बहुतांशी पालकत्व कोणत्या गोष्टीमुळे ठरत असते ?

(1) कुटुंबाचे जीवनमान

(2) प्रेम आणि द्वेष यांची सरमिसळ

(3) पालकांचे स्वत:चे पूर्वायुष्य

(4) घडलेले दु:खद आणि यातनादायी प्रसंग

**93.** पुढीलपैकी भाववाचक नाम कोणते ?

(1) शाळा (2) पालकत्त्व (3) विकास (4) आनंद

**94.** पालकत्त्वाला प्रभावित करणाऱ्या घटकांपैकी लेखकाने न सांगितलेला घटक कोणता ?

(1) तुमच्यातली संवेदनशीलता (2) तुमचे विचार-भावना

(3) तुमची आर्थिक सुबत्ता (4) तुमच्यातल्या जाणिवा

**95.** आयुष्य म्हणजे दोन टोकाच्या घटकांची सरमिसळ असते, असे लेखकाला वाटते. लेखकाने न सांगितलेला पर्याय कोणता ?

(1) प्रेम - द्वेष (2) चांगलं - वाईट (3) सुख - दु:ख (4) लोभ - मोह

**96.** पुढीलपैकी शब्दयोगी अव्यय असलेले वाक्य कोणते ?

(1) मुलांच्या सोबतीने सुरु केलेली आनंदयात्रा.

(2) इतरांना आणि स्वत:ला माफ करावे.

(3) त्याचे परिणाम हे पालकावर होतातच.

(4) आपण अप्रिय गोष्टी लवकर विसरतो.

**97.** लेखकाच्या मते व्यक्तिपरत्वे पालकत्त्व बदलत राहिले तरी एक गोष्ट सहसा बदलत नाही. ही बाब कोणती ?

(1) औदार्य (2) पालकत्त्वाचा गाभा आणि पाया

(3) नीरक्षीर विवेक (4) पालकत्त्वाचा अभ्यासक्रम

**98.** उताऱ्याच्या संदर्भात 'ओझं' या शब्दाचा नेमका अर्थ कोणता ?

(1) जबाबदारी (2) पालकत्त्व

(3) डोक्यावरचे वजन (4) एक जीवनमूल्य

**99.** 'गुरांच्या गळ्यात अडकविले लाकूड' या अर्थाचा कोणता शब्द उताऱ्यात आला आहे ?

(1) खेद (2) फटका (3) गाभा (4) लोढणं

**सूचना : पुढील कविता वाचा आणि प्रश्न क्रमांक 100 ते 105 यासाठी योग्य पर्यायाची निवड करा.**

सरिंवर सरी आल्या ग
सचैल गोपी न्हाल्या ग
गोपी झाल्या भिजून चिंब
थरथर कांपति निंब-कदंब
घनांमनांतुन टाळ-मृदंग
तनूंत वाजवि चाळ अनंग
पानें पिटिती टाळ्या ग
सरिंवर सरी आल्या ग

मल्हाराची जळांत धून
वीज नाचते अधुनमधून
वनांत गेला मोर भिजून
गोपी खिळल्या पदीं थिजून
घुमतो पांवा सांग कुठून ?
कृष्ण कसा उमटे न अजून ?
वेली ऋतुमति झाल्या ग
सरिंवर सरी आल्या ग

**100.** या कवितेत कशाचे वर्णन केले आहे ?

(1) कदंबाचे (2) पावसाचे (3) पानांचे (4) मोराचे

**101.** पुढीलपैकी कोण कदंबाशी संबंधित आहे ?

(1) गोपी (2) वेल (3) वीज (4) सरी

**102.** 'कृष्ण कसा उमटे न अजून ?' यातील 'कृष्ण' हे काय आहे ?

(1) भाववाचकनाम (2) विशेषनाम (3) नाम (4) सामान्यनाम

**103.** 'पावा' या शब्दाचा समानार्थी शब्द शोधा :

(1) नाद (2) लय (3) बासरी (4) धून

prepp
Your Personal Exams Guide

**104.** 'पानें पिटिती टाळ्या ग' यातून कोणता भाव प्रगट होतो ?

(1) सुख (2) तृप्ती (3) समाधान (4) आनंद

**105.** 'घुमतो पावा सांग कुठून' यांतील प्रश्नार्थक क्रियाविशेषण अव्यय ओळखा.

(1) पावा (2) सांग (3) घुमतो (4) कुठून

**106.** संकेतभाषेच्या संदर्भात पुढीलपैकी कोणते विधान योग्य नाही ?

(1) संकेत भाषेचे व्याकरण नसते. (2) संकेत भाषेचे व्याकरण असते.

(3) संकेत भाषेचे अनेक प्रकार आहेत. (4) संकेत भाषा ही नैसर्गिक भाषा आहे.

**107.** विविध गटांना पुढील नियत कार्य देण्यात आले आहे. या शब्दसंग्रह पाठांतर उपक्रमाला काय म्हणता येईल ?

पुढील शब्दातील शब्द आणि कथन यांचा सहसंबंध स्पष्ट करणारा घटक शोधा.

(कुटुंब) (नातेसंबंध) (भावना)

(1) शब्दसंग्रह जोडी (Cluster Vocabulary)

(2) शब्द जाल (Word - Web)

(3) आशयात्मक शब्दसंग्रह (Thematic Vocabulary)

(4) शब्द जोडी (Word Cluster)

**108.** व्याकरणाच्या अध्ययन–अध्यापनात कार्यात्मक (Procedural) ज्ञान म्हणजे ....

(1) व्याकरणिक घटकांचे नियम माहित असणे

(2) भाषा आणि तिची संस्कृती माहित असणे

(3) व्याकरणिक घटक कसे वापरावे याचे ज्ञान

(4) व्याकरणिक घटकांबद्दल माहिती असणे

**109.** एखादी विशिष्ट माहिती मिळवण्यासाठी विद्यार्थी वर्तमानपत्रातील बातमी वाचतो. हे वाचन म्हणजे...

(1) न्याहाळणे (Scanning) (2) अभ्यास कौशल्य

(3) समीक्षात्मक वाचन (4) चाळणे (Skimming)

**110.** एक भाषा शिक्षिका इंग्रजीतून एक कथा सांगते आणि विद्यार्थ्यांना ती कथा त्यांच्या भाषेत आणि वर्गाच्या भाषेत सांगण्यास लावते. या शैक्षणिक उपक्रमाला काय म्हणता येईल ?

(1) बहुभाषा शिक्षण (2) भाषा संपादन

(3) प्रतिभाषिकता (Translanguaging) (4) बहुभाषिक धोरण

**111.** सहाव्या इयत्तेची विद्यार्थीनी श्रेया, वडिलांची बदली झाल्यामुळे जलंधर (पंजाब) येथून मदुरै (तामिळनाडू) येथे येते. तिला तिची मातृभाषा, पंजाबी येते आणि शाळेतील दुसरी भाषा म्हणून इंग्रजी येते. सवंगड्यांच्या नि सभोवतालच्या मदतीने ती तामिळ बोलू-वाचू लागते. तिच्या या क्षमतेच्या संदर्भात कोणते विधान **योग्य** आहे ?

(1) तीनही भाषा, पंजाबी, तामिळ आणि इंग्रजी म्हणजे भाषा शिक्षण

(2) तिचे इंग्रजी म्हणजे भाषा संपादन आणि पंजाबी व तामिळ म्हणजे भाषा शिक्षण

(3) तिचे पंजाबी आणि तामिळचे ज्ञान म्हणजे भाषा संपादन आणि इंग्रजी म्हणजे भाषा शिक्षण

(4) तिचे तामिळ म्हणजे भाषा संपादन आणि इंग्रजी व पंजाबी म्हणजे भाषा शिक्षण

**112.** इयत्ता सातवीची शिक्षिका वर्गात जोडकार्य करुन घेते. जोड्यांना दहा वाक्ये असलेली कथा दिली जाते. जोडीतील एक मूल पहिले वाक्य वाचते नि दूसरे मूल ते वाक्य लिहिते. नंतर दुसरे मूल वाक्य वाचते नि पहिले मूल वाक्य लिहिते. या प्रकारे ते उपक्रम पूर्ण करतात शेवटी त्यांचे लेखन मूळ मजकुराशी तपासून घेतात. या उपक्रमाला काय म्हणतात ?

(1) श्रुति-लेखन (Dictation)

(2) परस्पर श्रुति-लेखन (Mutual Dictation)

(3) परस्पर लेखन

(4) परस्पर श्रवण

**113.** नित्यंदिन व्यवहारात परस्परांशी बोलली जाणारी भाषा म्हणजे ...

(1) संज्ञापनात्मक भाषा कौशल्य

(2) परस्पर भाषा नैपुण्य

(3) ज्ञानात्मक शैक्षणिक भाषा नैपुण्य (CALP)

(4) मूलभूत परस्पर भाषा संज्ञापन कौशल्य (BICS)

**114.** माध्यमिक पातळीवरची शिक्षिका विद्यार्थ्यांना एक मजकूर/कथा वाचून त्यावर मजकुरातील आशय आणि कल्पना यावर शक्ती आणि न्याय या दृष्टिकोनातून चर्चा करायला सांगते. या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या कोणत्या घटकाचा विकास शिक्षिकेला अपेक्षित आहे ?

(1) समीक्षात्मक भाषा विकास

(2) उच्च पातळीवरचे भाषा कौशल्य

(3) समीक्षात्मक साक्षरता कौशल्य

(4) समीक्षात्मक शिक्षणशास्त्र

**115.** एक शिक्षण पद्धती जिच्यात एक शिक्षक आणि एकाच समूहातील चार वेगवेगळे विद्यार्थी एकत्र येतात. उताऱ्यातील आशयावर त्यांच्यात संवाद घडतो. यातून एकसमान विकास होऊन वाचन आकलन सुधारते. ही पद्धत म्हणजे ...

(1) संरचनात्मक पद्धती

(2) आदर्श वाचन

(3) व्याकरण भाषांतर पद्धती

(4) अन्योन्य अध्यापन (Reciprocal Teaching)

**116.** उपचारात्मक शिक्षण हे __________ यांना दिले जाते.

(1) आपले अध्ययन/अध्यापन सुधारुन घेण्याची इच्छा असणाऱ्या विद्यार्थी आणि शिक्षकांना

(2) भाषा परीक्षेत मुलांचे गुण वाढावे असे वाटणाऱ्या विद्यार्थ्यांना

(3) ज्यांना भाषा शिक्षणात काही विशिष्ट मुद्यांवर विशेष गरज असते

(4) विशिष्ट विद्यार्थ्यांच्या गरजा लक्षात घेऊन स्वत:चे शिक्षण सुधारुन घेणाऱ्या शिक्षकांना

**117.** आंतरभाषीय ओळख म्हणजे ...

(1) मूळ भाषेचे ज्ञान हे दुसरी भाषा शिकण्यात अडथळा आणते असे विद्यार्थ्याला वाटणे.

(2) वेगवेगळ्या भाषा शिकण्यासाठी वेगवेगळ्या क्षमता लागतात असे विद्यार्थ्याचे निरीक्षण असणे.

(3) विद्यार्थ्याला मूळ भाषा आणि लक्ष्य भाषा यांत बरेच साम्य असल्याची जाणीव होणे.

(4) विद्यार्थ्याला मूळ भाषा आणि लक्ष्य भाषा यांत साम्य नसल्याची जाणीव होणे.

**118.** कोझिकोड परिसरात विशिष्ट समुदायात बोलली जाणारी मलयालम भाषा ही त्या परिसरातील दुसऱ्या भागात बोलल्या जाणाऱ्या मलयालम भाषेपेक्षा किंचित वेगळी आहे. विशिष्ट समुदायाकडून बोलली जाणारी मलयालम भाषा म्हणजे ...

(1) मलयालमची सामाजिक बोली

(2) त्या दोन्ही स्वतंत्र भाषा आहेत

(3) मलयालमचे दोन प्रकार

(4) मलयालमची प्रादेशिक बोली

**119.** पुढीलपैकी विस्तृत वाचनाचे कोणते उद्दिष्ट नाही ?

(1) व्याकरणाचे ज्ञान मिळविण्यासाठी वाचन

(2) आनंदासाठी वाचन

(3) आकलनासाठी वाचन

(4) भाकित करण्यासाठी वाचन

**120.** त्रिभाषा धोरणाच्या संदर्भात पुढीलपैकी कोणते विधान **योग्य** आहे ?

(1) मातृभाषा/घरची भाषा/हिंदी ही प्रथम भाषा असणे.

(2) मातृभाषा/घरची भाषा/इंग्रजी ही प्रथम भाषा असणे.

(3) मातृभाषा/घरची भाषा/प्रादेशिक भाषा ही प्रथम भाषा असणे.

(4) इंग्रजी/हिंदी/घरची भाषा/स्थानिक भाषा ही प्रथम भाषा असणे.

prepp
Your Personal Exams Guide

परीक्षार्थींनी **भाषा–II** चा पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी **भाग–V** मधील ( **प्रश्न क्र.** 121 ते 150 ) यांची उत्तरे द्यावीत.

Candidates should attempt the questions from **Part-V (Q.No. 121-150)**, if they have opted **MARATHI** as **Language-II** only.

**भाग–V**

**भाषा–II**

**मराठी**

**महत्त्वपूर्ण :** परीक्षार्थींनी भाषा – **II** चा पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी **भाग – V** मधील **( प्रश्न क्र. 121 ते 150 )** यांची उत्तरे द्यावीत.

**सूचना : पुढील उतारा वाचा आणि प्रश्न क्रमांक 121 ते 128 यासाठी योग्य पर्यायाची निवड करा.**

आज पालकत्वासमोर अनेक आव्हानं उभी आहेत. बाहेर घडणाऱ्या प्रत्येक सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि वैज्ञानिक बदलांचे परिणाम किंवा दुष्परिणाम हे आज घराघरात शिरले आहेत. त्यामुळेच आपली घरं ही यातल्या धोक्यांपासून अलिप्त राहू शकत नाहीत. साहजिकच कौटुंबिक उलथापालथीही मोठ्या प्रमाणात घडू लागल्या आहेत. आपण ज्या वातावरणात वाढलो, ते वातावरण एकीकडे आणि आपण सध्या ज्या वातावरणात मुलांना वाढवतो आहोत, ते दुसरीकडे, यातली तफावत, किंबहुना प्रचंड मोठी दरी पाहिली की सामान्य पालकाचं डोकं चक्रावून जातं. ते स्वाभाविकही आहे...

नियतीने आपल्यापुढे काय बरंवाईट वाढून ठेवलंय याची जशी आपल्याला कल्पना नसते, तशीच विज्ञानाने, तांत्रिक बदलाने, नवनव्या शोधांनी, इंटरनेटसारख्या महाजालाने, मोबाईलसारख्या तंत्रज्ञानाने आपल्यापुढे अजून काय वाढून ठेवलं आहे, याची आपल्याला कल्पना नाही. नाकासमोर चालून स्वत:चा प्रवास आजवर केलेल्या पालकांना खूप धास्ती वाटते आहे. पालकत्व ही केवळ जबाबदारी नसून ती एक आनंद यात्रा आहे जी आपण आपल्यासाठी सुरू केली आहे आणि आपल्या मुलांना त्यात सहभागी करून घेतलं आहे, ही भावना खूप खोलवर रुजायला हवी.

पालकत्व हे उपकार नव्हेत. पालकत्व हे कोणी कोणावर केलेलं किंवा कोणी कोणाला दिलेलं ऋण नव्हे. आपलं आयुष्य परिपूर्ण व्हावं, समृद्ध व्हावं, आपल्या आनंदात, सुखात आपल्या हक्काची माणसं सोबत असावीत या निकोप सहजीवनाच्या दृष्टीने पालकत्वाकडे बघायला हवं आणि हेच पालकत्व जोपासायला हवं. आपण आपल्यासाठी पालक झालो आहोत, मुलांसाठी नव्हे; ही जाणीव सर्वप्रथम आपल्या मनात असायला हवी...

पालकत्व ही एक सर्जनशील अशी जीवनपद्धती आहे. प्रेम आणि क्षमाशीलता हा तिचा पाया आहे. संयम, चिकाटी आणि सातत्य हे तिचे महत्त्वाचे निकष आहेत. मुलांवर सतत रागावणं, ओरडणं, घरात चिडचिड करणं, त्यांना शिक्षा करणं हे खुप वरवरचे, उथळ आणि चटकन सुचणारे अत्यंत सवंग उपाय आहेत.

पालकत्व हे निसर्गानं दिलेलं वरदान आहे आणि त्यामुळेच त्याचा नैसर्गिक ढाचा हा कायम ठेवला पाहिजे. धोक्यापासून आपल्या अपत्याचा बचाव करणं, ते मोठे होईपर्यंत त्याचं उत्तम संगोपन करणं, त्यांच्या पंखात बळ देण्यासाठी प्रयत्न करणं हा निसर्ग नियम आहे.

**121.** निकोप सहजीवनाच्या दृष्टीने पालकत्त्वाकडे पाहताना कोण आपल्यासोबत असावे, असे लेखकाला वाटते ?

(1) मोबाईल (2) तांत्रिक बदल

(3) हक्काची माणसं (4) इंटरनेट

**122.** पालकत्व म्हणजे निसर्गाने दिलेले वरदान आहे असे लेखक म्हणतो. त्याच्या मते पुढीलपैकी कोणती बाब आपण कायम ठेवली पाहिजे ?

(1) सवंग उपाय (2) सक्तीचे नियंत्रण (3) नैसर्गिक ढाचा (4) जबाबदारी

Prepp
Your Personal Exams Guide

**123.** लेखकाच्या मते कोणती भावना खोलवर रुजणे गरजेचे आहे ?

(1) आपण मुलांसाठी पालक झालो आहोत, आपल्यासाठी नव्हे.

(2) रागावणे, ओरडणे, शिक्षा करणे हे नेमके उपाय आहेत.

(3) पालकत्त्व ही जबाबदारी नसून आनंदयात्रा आहे.

(4) विज्ञान-तंत्रज्ञानाची जाणीव निरूपयोगी आहे.

**124.** पालकत्त्वाच्या नैसर्गिक नियमांमधील लेखकाने न सांगितलेला नियम कोणता ?

(1) त्यांच्या पंखात बळ देण्यासाठी प्रयत्न करणे

(2) वरवरचे, उथळ आणि चटकन सुचणारे उपाय शिकवणे

(3) धोक्यापासून बचाव करण्याचे तंत्र शिकवणे

(4) ते मोठे होईपर्यंत उत्तम संगोपन करणे

**125.** मुलांवर सतत रागावणं, ओरडणं हे सवंग उपाय आहेत. या वाक्यातील अधोरेखित शब्दाची जात शोधा.

(1) क्रिया विशेषण (2) भाववाचक नाम

(3) उभयान्वयी अव्यय (4) शब्दयोगी अव्यय

**126.** लेखकाच्या मते आज कोणत्या गोष्टीने घराघरांत प्रवेश केला आहे ?

(1) इंटरनेट, मोबाईल बद्दलची अलिप्तता

(2) पालकांना वाटणारी धास्ती

(3) बाह्य जगातील बदलाचे परिणाम-दुष्परिणाम

(4) उथळ, वरवरचे सवंग उपाय

**127.** 'पालकांना खूप धास्ती वाटते' या वाक्यात कोणते विशेषण आहे ?

(1) गुणविशेषण (2) आवृत्तीवाचक विशेषण

(3) क्रमवाचक संख्या विशेषण (4) गणनावाचक संख्या विशेषण

**128.** 'धास्ती' या शब्दाचा समानार्थी आशय नसलेला शब्द कोणता ?

(1) काळजी (2) धारणा (3) दहशत (4) चिंता

Prepp
Your Personal Exams Guide

**सूचना : पुढील उतारा वाचा आणि प्रश्न क्रमांक 129 ते 135 यासाठी योग्य पर्यायाची निवड करा.**

पृथ्वीवर हजारो वर्षांपासून हवामान आणि पर्यावरण यांचा निसर्गनियमांप्रमाणे समतोल राखला जात होता; परंतु औद्योगिक क्रांती आणि एकूणच माणसाच्या विकासासाठी खूप झाडे आपण तोडायला सुरुवात केली. लोकसंख्या वाढली, प्रदूषण वाढले आणि शहरे सुजायला लागली. त्या विकासाच्या घोडदौडीत निसर्गाचा समतोल मात्र माणसाने बिघडवला. आता त्याचेच परिणाम तापमानात वाढ, हवामान बदल आणि नैसर्गिक आपत्तीच्या स्वरूपाने आपण पाहत आणि अनुभवत आहोत. हिवाळ्यात लावावा लागणारा कूलर-एअर कंडिशन, अवकाळी येणारा पाऊस, 40-45 डिग्रीपर्यंत जाणारे तापमान हे काही आपल्याला नवीन नाही. आता हवामान बदल दूर राहिला नसून, तो आपण प्रत्यक्षात अनुभवत आहोत. कॅनडामध्ये आलेली उष्णतेची लाट, सौदी अरेबियामध्ये आलेला पूर, ऑस्ट्रेलियात लागणारे वणवे हेदेखील त्याचाच भाग आहे. जगासमोर असलेलं हवामान बदल हे सर्वात मोठं आव्हान असून, त्याचा परिणाम समाजातील सर्व स्तरांवर दिसून येत आहे.

अनेक संशोधक वाढणारे तापमान, वितळणारी हिमशिखरं-हिमनद्या, सतत येणारी वादळं, पूर, दुष्काळ आणि समुद्राच्या पातळीत होणारी वाढ याचा संबंध हरितवायू उत्सर्जनाशी लावतात. त्याचा परिणाम आपल्याला कमी-जास्त प्रमाणात जगाच्या सगळ्या कोपऱ्यात, भारतात आणि महाराष्ट्रातही दिसून येतो. या वातावरण बदलाचा तुमच्या-माझ्यावर आणि महाराष्ट्रावर काय परिणाम होणार आहे, हे जाणून घेणे गरजेचे आहे.

आज कार्बनडायॉक्साइड ($CO_2$), मिथेन, ओझोन आणि पाण्याची वाफ हे हवेत नसते, तर आपली पृथ्वी ही 30 डिग्रीनी आजपेक्षा थंड असती. म्हणजेच काय तर पृथ्वीवरील तापमान नियंत्रित ठेवण्यात या वायूंचा मोठा वाटा आहे. एकूण वातावरणातील या वायूंच्या प्रमाणातील बदलाचा पृथ्वीवरील तापमानावर परिणाम होतो. आयपीसीसी (इन्टरगव्हर्मेंटल पॅनेल ऑन क्लॅमेट चेंज) च्या रिपोर्टनुसार 1880-2012 या काळात पृथ्वीचे तापमान 0.85 डिग्रीनी वाढले, जे मुख्यत: कार्बनडायॉक्साइडसारख्या हरितगृह वायूंच्या अतिउत्सर्जनामुळे झाले, असे अभ्यासक मानतात. बर्फात अडकलेल्या हवेच्या अभ्यासावरून चार लाख वर्षांपूर्वीपर्यंत हवेत कार्बनडायॉक्साइडचे प्रमाण किती असावे, याचा अंदाज बांधता येतो. त्यानुसार हे कार्बनडायॉक्साइडचे प्रमाण हिमयुगानंतर 180-280 पीपीएम इतके होते, जे आज 400 पीपीएम एवढे वाढले आहे.

**129.** संशोधकांनी हरित वायु उत्सर्जनाशी ज्या गोष्टींचा संबंध लावला आहे, त्यापैकी चुकीचा पर्याय शोधा :

(1) पृथ्वीच्या तापमानात होणारी वाढ  (2) समुद्र पातळीत होणारी घट

(3) वाढते तापमान  (4) वितळणारी हिमशिखरं

**130.** लेखकाच्या मते आज कोणती गोष्ट थेट आपल्या अनुभवाला येत आहे ?

(1) हवामान बदल  (2) ऑस्ट्रेलियातील वणवे

(3) सौदी अरेबियाचा पूर  (4) बर्फात अडकलेली हवा

**131.** 'हवामान बदल हे सर्वात <u>मोठं</u> आव्हान आहे' या वाक्यातील अधोरेखित शब्द काय आहे ?

(1) विशेषनाम (2) सर्वनाम (3) विशेषण (4) क्रियापद

**132.** लेखकाच्या मते जग, भारत आणि महाराष्ट्रात कोणत्या गोष्टीचे परिणाम दिसू लागले आहेत ?

(1) हरितवायू उत्सर्जन (2) कॅनेडातील उष्णतेची लाट

(3) अनुकूल हवामान (4) सार्वत्रिक विकास

**133.** लेखकाच्या मते कोणत्या गोष्टीत वाढ झाली आहे ?

(1) निसर्गाचा समतोल (2) आयपीसीसी रिपोर्ट

(3) हवेतील कार्बन डायऑक्साइडचे प्रमाण (4) शहरांमधील वृक्षव्याप्त क्षेत्रफळ

**134.** उताऱ्यात आलेल्या 'वाटा' शब्दाचा नेमका अर्थ असलेला पर्याय निवडा.

(1) विल्हेवाट (2) सहभागिता (3) मार्ग (4) रस्ता

**135.** ''प्रदूषण वाढले आणि शहरे सुजायला लागली'' या वाक्यातील सामान्यनाम ओळखा.

(1) आणि (2) लागली (3) वाढले (4) शहर

**136.** भाषा शिक्षणाच्या संदर्भात 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - 2020' नुसार कोणते विधान योग्य नाही ?

(1) त्रैभाषिक धोरणानुसार भारतीय भाषेचा अभ्यास

(2) त्रैभाषिक धोरणानुसार इंग्रजीचा अभ्यास

(3) त्रैभाषिक धोरणानुसार एका अभिजात भाषेचा अभ्यास

(4) त्रैभाषिक धोरणानुसार मातृभाषा/घरच्या भाषेचा अभ्यास

**137.** आठवीच्या वर्गातील शिक्षिका पाच वाक्यांचा इंग्रजी मजकूर वाचते नि मुलांना काळजीपूर्वक ऐकायला सांगते. या नंतर ती मुलांना चार-चारच्या गटात बसून तोच मजकूर वेगळ्या प्रकारे जवळच्या विद्यार्थ्याला सांगायला लावते. ही कृती म्हणजे...

(1) सामूहिक लेखन (2) श्रवण कार्य

(3) लेखन कार्य (4) परिच्छेद लेखन

**138.** चांगले भाषिक लेखन शिकण्यासाठी पुढीलपैकी कोणत्या प्रक्रियेचा सहभाग असावा ?

(1) बुद्धिमंथन–मुद्यांचे टाचण–कच्चा मसुदा–संपादन–आराखडा–अंतिम स्वरूप

(2) बुद्धिमंथन–मुद्यांचे टाचण–आराखडा–कच्चा मसुदा–संपादन–अंतिम स्वरूप

(3) बुद्धिमंथन–आराखडा–कच्चा मसुदा–मुद्यांचे टाचण–संपादन–शेवटचे लेखन

(4) बुद्धिमंथन–मुद्यांचे टाचण–कच्चा मसुदा–आराखडा लेखन–संपादन–शेवटचे लेखन

**139.** भाषा शिक्षणाच्या संदर्भात कोणते विधान **योग्य** आहे ?

(1) मूळ/प्रथम भाषेचे ज्ञान द्वितीय भाषा शिकण्यात मदतरूप ठरते.

(2) प्रथम भाषा शिकणे आणि दुसरी भाषा या पूर्णत: भिन्न आहेत.

(3) मूळ/प्रथम भाषेचे ज्ञान हे द्वितीय भाषा शिकण्यात अडथळा आणते.

(4) मूळ/प्रथम भाषेच्या ज्ञानाचा द्वितीय भाषा शिकण्याशी काहीही घेणे देणे नसते.

**140.** इलाम हा इयत्ता सातवीचा विद्यार्थी असून त्याला कन्नड, मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषा बोलता येतात. घरी आपल्या पालकांशी तो या चारही भाषांत मुक्तपणे बोलतो आणि वर्गात तो हिंदी, कन्नड आणि इंग्रजीतून बोलतो कारण या भाषा त्याच्या मित्रांना व शिक्षकांना अवगत आहे. त्याचे हे कौशल्य म्हणजे....

(1) भाषा बदल (Code Moving)

(2) आंतर भाषिकता (Interlanguage)

(3) भाषेची सार्वत्रिक क्षमता

(4) कोड मेशिंग (Code Meshing)

**141.** पुढीलपैकी कोणत्या घटकाचा संबंध शैक्षणिक भाषेतील नैपुण्य किंवा भाषेच्या विविध अंतर्भूत भागांसाठी लावला जातो ?

(1) संवादात्मक भाषा नैपुण्य

(2) ज्ञानात्मक शैक्षणिक भाषा नैपुण्य (CALP)

(3) आंतरभाषीय नैपुण्य

(4) परस्परातील मूळ संवाद कौशल्य (BICS)

**142.** विद्यार्थ्यांना विषयाचे नीट आकलन होण्यासाठी अपेक्षित विषयाच्या विरुद्ध दृष्टिकोनाचा परिचय त्यांना करुन दिला जातो. या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या कोणत्या कौशल्याला मदत/उत्तेजन मिळते?

(1) चिकित्सक साक्षरता

(2) साक्षरता विकास

(3) चिकित्सक विश्लेषण (Critical Analysis)

(4) प्रक्रियाधिष्ठित शिक्षणशास्त्र

**143.** शब्द संग्रह शिकविण्यासाठी शिक्षिका वर्गात स्वयंपाक घरातील चमचा, प्लेट, भांडी, डबे आणि तवा घेऊन येते. भाषा शिक्षणात या वस्तूंना काय म्हणता येईल?

(1) स्वयंपाकाच्या वस्तू

(2) जीवनसंदर्भ असलेली साधने

(3) शैक्षणिक साधने

(4) रेलिया (Realia)

**144.** समाजशास्त्र विषयाचे विद्यार्थी व्याख्यानातील मुख्य कल्पना आत्मसात करुन त्यांच्या नोंदी टिपतात. हे कौशल्य म्हणजे...

(1) लेखन कौशल्य

(2) ज्ञानात्मक कौशल्य

(3) अभ्यास कौशल्य

(4) श्रवण कौशल्य

**145.** शिक्षणाचे फलित विद्यार्थ्याला मदतरूप ठरते...

(1) सर्व कौशल्यांची किमान पातळी आत्मसात करण्यास

(2) लक्षणीय भाषा घटक आत्मसात करण्यास

(3) लक्षणीय व्याकरणिक ज्ञान संपादन करण्यास

(4) लक्षणीय क्षमता साध्य करण्यास

**146.** भाषा-सार्वत्रिकता (Translanguaging) म्हणजे...

(1) ही एक शिक्षणशास्त्रातील प्रक्रिया आहे ज्यात वर्गामध्ये एकापेक्षा अधिक भाषांचा साधन म्हणून वापर करणे.

(2) हे एक 'शिक्षणात-भाषा' हे धोरण असून यात वर्गात किती भाषा शिकवायच्या हे ठरवणे.

(3) भाषेच्या अध्ययन अध्यापनात एका भाषेकडून दुसऱ्या भाषेकडे जाणे.

(4) विशिष्ट काळानंतर भाषिक बदलांचे ज्ञान.

**147.** येथे एक प्रश्न आहे. तो वाचा आणि कोणत्या प्रश्नाचे प्रारूप योग्य आहे ते सुचवा.

"एका लहान मुलीची गोष्ट वाचल्यानंतर तिला होणारा मानसिक त्रास आणि शारीरिक वेदनांना ती किती धैर्याने सामने जाते याची तुम्हाला जाणीव होते". तुम्ही त्या मुलीला कौतुक करणारे पत्र लिहिता. 120 शब्दांत हे पत्र लिहा.

(1) अंदाजित प्रश्न (Extrapolative Question)

(2) स्वैर/स्वच्छंद प्रश्न (Discursive Question)

(3) भावदर्शी प्रश्न (Expressive Question)

(4) दीर्घोत्तरी प्रश्न

**148.** त्रिभाषा धोरणाच्या संदर्भात पुढीलपैकी कोणते विधान योग्य आहे ?

(1) सर्व मुले त्यांच्या शिक्षणाची सुरुवात हिंदी या अधिकृत भाषेतून करतात आणि हायस्कूलचे शिक्षण पूर्ण होईपर्यंत किमान दोन अधिक भाषा संपादित करतात.

(2) सर्व मुले त्यांच्या शिक्षणाची सुरुवात त्यांच्या मातृभाषेत/घरच्या भाषेत करतात आणि हायस्कूलचे शिक्षण पूर्ण होईपर्यंत किमान दोन अधिक भाषा संपादित करतात.

(3) सर्व मुले त्यांच्या शिक्षणाची सुरुवात इंग्रजी/घरची भाषा माध्यमातून करतात आणि हायस्कूलचे शिक्षण पूर्ण होईपर्यंत किमान दोन अधिक भाषा संपादित करतात.

(4) सर्व मुले त्यांच्या शिक्षणाची सुरुवात त्यांच्या प्रदेश भाषेतून करतात आणि हायस्कूलचे शिक्षण पूर्ण होईपर्यंत किमान दोन अधिक भाषा संपादित करतात.

**149.** पुढीलपैकी कोणती पद्धती 'मौखिक सराव' आणि 'भाषेच्या मूलभूत घटकांत नैपुण्य' याला भाषा अध्ययनाचा अनिवार्य भाग मानते ?

(1) व्याकरण भाषांतर पद्धती

(2) समग्र शारीरिक प्रतिसाद

(3) श्रव्यभाषिकता (Audiolingualism)

(4) संवादात्मक भाषा शिक्षण

**150.** निर्देशक ज्ञान (Declarative Knowledge) म्हणजे...

(1) व्याकरणातील घटकांतील त्रुटी ओळखणे

(2) व्याकरणिक घटक सोडवणे

(3) भाषेतील शब्दांचे उच्चारण जाणणे

(4) व्याकरणातील घटकांविषयी जाणणे

- o O o -

www.prepp.in

prepp
Your Personal Exams Guide

SPACE FOR ROUGH WORK

**खालील सूचना काळजीपूर्वक वाचा :**

1. वेगवेगळ्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी प्रश्न पत्रिकेत योग्य ठिकाणी सूचना देण्यात आल्या आहेत. प्रश्नांची उत्तरे देण्याअगोदर त्या सूचना काळजीपूर्वक वाचा.

2. प्रत्येक प्रश्नासाठी दिलेल्या चार पर्यायांपैकी बरोबर उत्तरासाठी OMR उत्तरपत्रिकेच्या **बाजू-2** वर केवळ एकच वर्तुळ **निळ्या किंवा काळ्या बॉल पॉइन्ट पेन** ने संपूर्ण निळे/काळे भरा. एकदा उत्तराचे वर्तुळ भरल्यावर ते बदलता येणार नाही.

3. परीक्षार्थींनी उत्तर पत्रिकेला कोठेही घडी पडणार नाही किंवा त्यावर कुठलीही असंबद्ध खूण केली जाणार नाही याची काळजी घ्यावी. परीक्षार्थींनी आपला अनुक्रमांक उत्तर पत्रिकेत नेमून दिलेल्या जागेव्यतिरिक्त अन्यत्र लिहू नये.

4. चाचणी-पुस्तिका आणि उत्तरपत्रिका काळजीपूर्वक हाताळा. कारण कोणत्याही परिस्थितीत (चाचणी-पुस्तिकेचा कोड अथवा क्रमांक आणि उत्तरपत्रिकेचा कोड अथवा क्रमांक यांमधील विसंगती वगळता) दुसरा संच पुरविला जाणार नाही.

5. चाचणी-पुस्तिका/उत्तरपत्रिका यांवर दिलेला कोड आणि क्रमांक परीक्षार्थींनी उपस्थिती पृष्ठावर बरोबर लिहावा.

6. OMR उत्तरपत्रिकेतील माहितीचे वाचन संगणकाच्या मदतीने केले जाते. त्यामुळे कोणतीही माहिती अपुरी किंवा प्रवेश पत्रकातील माहितीपेक्षा वेगळी देऊ नये.

7. परीक्षार्थींना कोणतीही पाठ्यपुस्तकाची सामग्री, मुद्रित अथवा लिखित, कागदाचे तुकडे, पेजर, मोबाईल फोन, इलेक्ट्रॉनिक उपकरण अथवा प्रवेशपत्रिकाव्यतिरिक्त अन्य कोणतीही सामग्री परीक्षेच्या सभागृहात/खोलीमध्ये आणण्याची परवानगी नाही.

8. मोबाईल फोन, तार रहित संभाषण यंत्र, (बंद केलेल्या अवस्थेतही) किंवा इतर निषिद्ध वस्तू परीक्षाकेन्द्रात आणू नये. तसे केल्याचे आढळल्यास त्याला 'अनफेअर मीन्स' गृहीत धरले जाईल आणि त्यावर परीक्षा निरस्त करणे या सकट इतर कार्यवाही करण्यात येईल.

9. प्रत्येक परीक्षार्थीने त्याची/तिची प्रवेश-पत्रिका पर्यवेक्षकांनी मागितल्यावर त्यांना दाखवली पाहिजे.

10. पर्यवेक्षक अथवा अधीक्षक यांच्या खास परवानगीशिवाय कोणत्याही परीक्षार्थीला आपली जागा सोडता येणार नाही.

11. कामावर असलेल्या पर्यवेक्षकांकडे उत्तरपत्रिका दिल्याखेरीज आणि उपस्थिती पृष्ठावर दोनदा सही केल्या खेरीज परीक्षार्थींनी परीक्षागृह सोडू नये. ज्या परीक्षार्थींनी उपस्थिती पृष्ठावर दुसऱ्यांदा सही केलेली नसेल त्यांची उत्तर पत्रिका पर्यवेक्षकाकडे दिली गेलेली नाही, असे समजले जाईल आणि ती बाब अनुचित साधनाची बाब मानली जाईल. परीक्षार्थींनी आपल्या डाव्या हाथाच्या अंगठ्याचा ठसा उपस्थिती पृष्ठावर दिलेल्या ठिकाणी करावा.

12. इलेक्ट्रॉनिक/हस्तसंचालित गणितयंत्रा (Calculator) चा उपयोग निषिद्ध आहे.

13. परीक्षागृहातील वर्तणुकीबाबत परीक्षार्थींना बोर्डाच्या नियमांचे पालन करावे लागेल. अनुचित साधनाच्या सर्व बाबींचा निर्णय बोर्डाच्या नियमांनुसार केला जाईल.

14. चाचणी-पुस्तिका अथवा उत्तरपत्रिका यांचा कोणताही भाग कोणत्याही परिस्थितीत सुटा करू नये.

15. **चाचणी पूर्ण झाल्यानंतर परीक्षार्थींनी उत्तरपत्रिका परीक्षागृहातील पर्यवेक्षकाकडे दिली पाहिजे. चाचणी-पुस्तिका परीक्षार्थी आपल्याबरोबर घेऊन जाऊ शकतात.**

Prepp
Your Personal Exams Guide

## निम्नलिखित निर्देशों को ध्यान से पढ़ें :

1. जिस प्रकार से विभिन्न प्रश्नों के उत्तर दिए जाने हैं उसका वर्णन परीक्षा पुस्तिका में किया गया है, जिसे आप प्रश्नों का उत्तर देने से पहले ध्यान से पढ़ लें।
2. प्रत्येक प्रश्न के लिए दिए गए चार विकल्पों में से सही उत्तर के लिए OMR उत्तर पत्र के **पृष्ठ-2** पर केवल एक वृत्त को ही पूरी तरह **नीले/काले बॉल पॉइन्ट पेन** से भरें। एक बार उत्तर अंकित करने के बाद उसे बदला नहीं जा सकता है।
3. परीक्षार्थी सुनिश्चित करें कि इस उत्तर पत्र को मोड़ा न जाए एवं उस पर कोई अन्य निशान न लगाएँ। परीक्षार्थी अपना अनुक्रमांक उत्तर-पत्र में निर्धारित स्थान के अतिरिक्त अन्यत्र न लिखें।
4. परीक्षा पुस्तिका एवं उत्तर पत्र का ध्यानपूर्वक प्रयोग करें, क्योंकि किसी भी परिस्थिति में (केवल परीक्षा पुस्तिका एवं उत्तर पत्र के कोड या संख्या में भिन्नता की स्थिति को छोड़कर) दूसरी परीक्षा पुस्तिका उपलब्ध नहीं करायी जाएगी।
5. परीक्षा पुस्तिका/उत्तर पत्र में दिए गए परीक्षा पुस्तिका कोड व संख्या को परीक्षार्थी सही तरीके से उपस्थिति-पत्र में लिखें।
6. OMR उत्तर पत्र में कोडित जानकारी को एक मशीन पढ़ेगी। इसलिए कोई भी सूचना अधूरी न छोड़ें और यह प्रवेश-पत्र में दी गई सूचना से भिन्न नहीं होनी चाहिए।
7. परीक्षार्थी द्वारा परीक्षा हॉल/कक्ष में प्रवेश-पत्र के सिवाय किसी प्रकार की पाठ्य-सामग्री, मुद्रित या हस्तलिखित, कागज़ की पर्चियाँ, पेजर, मोबाइल फोन, इलेक्ट्रॉनिक उपकरण या किसी अन्य प्रकार की सामग्री को ले जाने या उपयोग करने की अनुमति नहीं है।
8. मोबाइल फोन, बेतार संचार युक्तियाँ (स्विच ऑफ अवस्था में भी) और अन्य प्रतिबंधित वस्तुएँ परीक्षा हॉल/कक्ष में नहीं लाई जानी चाहिए। इस सूचना का पालन न होने पर इसे परीक्षा में अनुचित साधनों का प्रयोग माना जाएगा और परीक्षार्थी विरुद्ध कार्यवाही की जाएगी, परीक्षा रद्द करने सहित।
9. पूछे जाने पर प्रत्येक परीक्षार्थी, निरीक्षक को अपना प्रवेश-पत्र दिखाएँ।
10. केन्द्र अधीक्षक या निरीक्षक की विशेष अनुमति के बिना कोई परीक्षार्थी अपना स्थान न छोड़ें।
11. कार्यरत निरीक्षक को अपना उत्तर पत्र दिए बिना एवं उपस्थिति-पत्र पर दुबारा हस्ताक्षर किए बिना परीक्षार्थी परीक्षा हॉल/कक्ष नहीं छोड़ेंगे। यदि किसी परीक्षार्थी ने दूसरी बार उपस्थिति-पत्र पर हस्ताक्षर नहीं किए, तो यह माना जाएगा कि उसने उत्तर पत्र नहीं लौटाया है और यह अनुचित साधन का मामला माना जाएगा। **परीक्षार्थी अपने बाएँ हाथ के अंगूठे का निशान उपस्थिति-पत्र में दिए गए स्थान पर अवश्य लगाएँ।**
12. इलेक्ट्रॉनिक/हस्तचालित परिकलक का उपयोग वर्जित है।
13. परीक्षा हॉल/कक्ष में आचरण के लिए परीक्षार्थी परीक्षण संस्था के सभी नियमों एवं विनियमों द्वारा नियमित हैं। अनुचित साधनों के सभी मामलों का फैसला परीक्षण संस्था के नियमों एवं विनियमों के अनुसार होगा।
14. किसी भी परिस्थिति में परीक्षा पुस्तिका और उत्तर पत्र का कोई भाग अलग न करें।
15. **परीक्षा सम्पन्न होने पर, परीक्षार्थी हॉल/कक्ष छोड़ने से पूर्व उत्तर पत्र निरीक्षक को अवश्य सौंप दें। *परीक्षार्थी अपने साथ इस परीक्षा पुस्तिका को ले जा सकते हैं।***

## READ THE FOLLOWING INSTRUCTIONS CAREFULLY :

1. The manner in which the different questions are to be answered has been explained in the Test Booklet which you should read carefully before actually answering the questions.
2. Out of the four alternatives for each question, only one circle for the correct answer is to be darkened completely with **Blue / Black Ball Point Pen** on **Side-2** of the OMR Answer Sheet. The answer once marked is not liable to be changed.
3. The candidates should ensure that the Answer Sheet is not folded. Do not make any stray marks on the Answer Sheet. Do not write your Roll No. anywhere else except in the specified space in the Answer Sheet.
4. Handle the Test Booklet and Answer Sheet with care, as under no circumstances (except for discrepancy in Test Booklet Code or Number and Answer Sheet Code or Number), another set will be provided.
5. The candidates will write the correct Test Booklet Code and Number as given in the Test Booklet/Answer Sheet in the Attendance Sheet.
6. A machine will read the coded information in the OMR Answer Sheet. Hence, no information should be left incomplete and it should not be different from the information given in the Admit Card.
7. Candidates are not allowed to carry any textual material, printed or written, bits of papers, pager, mobile phone, electronic device or any other material except the Admit Card inside the examination hall/room.
8. Mobile phones, wireless communication devices (even in switched off mode) and the other banned items should not be brought in the examination halls/rooms. Failing to comply with this instruction, it will be considered as using unfair means in the examination and action will be taken against the candidate including cancellation of examination.
9. Each candidate must show on demand his/her Admit Card to the Invigilator.
10. No candidate, without special permission of the Centre Superintendent or Invigilator, should leave his/her seat.
11. The candidates should not leave the Examination Hall/Room without handing over their Answer Sheet to the Invigilator on duty and sign the Attendance Sheet twice. Cases where candidate has not signed the Attendance Sheet second time will be deemed not to have handed over the Answer Sheet and dealt with as an unfair means case. **The candidates are also required to put their left hand THUMB impression in the space provided in the Attendance Sheet.**
12. Use of Electronic/Manual Calculator is prohibited.
13. The candidates are governed by all Rules and Regulations of the Examining Body with regard to their conduct in the Examination Hall/Room. All cases of unfair means will be dealt with as per Rules and Regulations of the Examining Body.
14. No part of the Test Booklet and Answer Sheet shall be detached under any circumstances.
15. **On completion of the test, the candidate must hand over the Answer Sheet to the Invigilator in the Hall / Room. *The candidates are allowed to take away this Test Booklet with them.***